# शिक्षण उपसंचालक पुणे विभाग पुणे-१ यांचे कार्यालय

१७ डॉ बाबासाहेब आंबेडकर रोड, लालदेऊळाजवळ, पुणे-१

दुरध्वनी क्रमांक०२०-२६१२५६९६ -फॅक्स नं.- ०२०-२६१२२२१७

ई-मेल आय डी. क.dydepune@gmail.com वेब साईट आय.डी.क्र. www.dydepune.com


---

जा.क्र. शिउसं/पुवि/उमाशि-३/११ वी ऑ.प्र.प्र २०१४-१५/ दि. ०४ . ०२ .२०१४

प्रति,

सर्व मुख्याध्यापक,

(पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील) पुणे.

**विषय:- शैक्षणिक वर्ष सन 2014-15 पासून इयत्ता 11 वी चे प्रवेश केंद्रिय ऑनलाईन पध्दतीने करण्याबाबत.**

**संदर्भ:- दि.07.02.2014 रोजीची मुख्याध्यापक सभा**

पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील इ.11 वी चे प्रवेश गेली 18 वर्षे केंद्रिय ऑफलाईन पध्दतीने होत आहेत. शैक्षणिक वर्ष सन 2014-15 पासून इयत्ता 11 वी चे प्रवेश केंद्रिय ऑनलाईन पध्दतीने करण्यात येणार आहेत.

ऑनलाईन पध्दतीने प्रवेश करावयाचे असल्याने त्या अनुषंगाने खालील सूचना विद्यार्थ्यांना देण्यात याव्यात. यावावत संबंधित मुख्याध्यापकांनी गांभिर्याने कार्यवाही करावी.

1. एस.एस.सी.बोर्ड मार्च 2014 ची परीक्षा झाल्यावर पहिल्या 10 दिवसांत इ.10 वीच्या विद्यार्थ्यांना /पालकांना फॉर्म कसा भरावा याचे प्रात्यक्षिक दाखवावे.
2. विद्यार्थ्यांनी आपल्या घरी अथवा शाळेत संगणकावर ॲडमिशन फॉर्म भरण्याचा सराव करावा. वेबसाईटवर फॉर्म ठेवण्यात येईल.
3. शाखानिहाय कनिष्ठ महाविद्यालयाची माहिती असलेली पुस्तिका देण्यात येईल. सदर पुस्तिका विद्यार्थ्यांना स्वत:च्या शाळेत मिळेल. सदर पुस्तिकेत कनिष्ठ महाविद्यालयांची सविस्तर माहिती, प्रवेश प्रक्रियेची माहिती, सामाजिक व विशेष आरक्षणासंवंधी माहिती असेल. त्याचे काळजीपूर्वक वाचन करण्यास विद्यार्थी व पालकांना सांगावे.
4. फॉर्मचे दोन भाग असतील. पहिल्या भागात सर्व वैयक्तिक माहिती असेल तर दुसऱ्या भागात पसंतीक्रमानुसार कॉलेजची नावे लिहायची आहेत. प्रवेश अर्जाचा भाग-1 भरल्याशिवाय भाग-2 दिसणार नाही.
5. प्रवेशासंबंधी आवश्यक कागदपत्रे सत्यप्रतींसह :

| खुला वर्ग | सामाजिक आरक्षण (SC/ST/VJA/NTB/NTC/NTD/OBC/SBC) | विशेष आरक्षण अपंग/क्रीडा/कला/स्वातंत्र्य सैनिक/आजी-माजी सैनिक/बदली होऊन आलेले पालक |
|---|---|---|
| • गुणपत्रिका<br>• शाळा सोडल्याचा दाखला | • गुणपत्रिका<br>• शाळा सोडल्याचा दाखला | • गुणपत्रिका<br>• शाळा सोडल्याचा दाखला<br>• उपरोक्त प्रमाणे आवश्यक प्रमाणपत्र |

6. शाळेत संगणकाची माहिती असणारा लेखनिक व प्रवेशासंबंधी सर्व माहिती असणारा शिक्षक नियुक्त करावा.
7. शाळेत माहिती पुस्तके जमा-विक्री याबाबतचा अहवाल व्यवस्थित ठेवण्यात यावा.
8. शिक्षण विभागाच्या वेबसाईटवर ठेवलेल्या नमुन्यात विद्यार्थ्यांची अचूक माहिती प्रपत्रात तयार ठेवावी.

| अ क्र | विद्यार्थ्याचे नांव | जन्मतारीख | जात | जात संवर्ग | अल्पसंख्यांक | | | | | विशेष आरक्षण | | | | | पालकाचे नांव | फोन नंबर | स्वाक्षरी |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | | मुस्लिम | पारशी | ख्रिश्चन | बौध्द | जैन | माजी सैनिक पाल्य | आजी सैनिक पाल्य | खेळाडू | कला प्राविण्य | अपंग | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | |

9. फॉर्मसंदर्भात Website Address नंतर कळविण्यात येईल. त्यावर प्रवेशासंदर्भात संपूर्ण माहिती असेल.

(सही) ६/२/१४.

(सुमन शिंदे)
शिक्षण उपसंचालक,
पुणे विभाग, पुणे - 1
तथा
अध्यक्ष
केंद्रिय प्रवेश समिती, पुणे